MHBH070002482026

वारसान प्रमाणपत्र क्र. ०४/२०२६

वंदना +२..वि... निरंक

**आदेश निशानी क्र. १ वर पारीत**

(दिनांक २९ जून, २०२६ रोजी घोषित)

सदरचा अर्ज वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ हे एकमेकांचे बहीणी आहेत. अर्जदारांचे वडील दत्तात्रय पंढरीनाथ तुळणकर हे पंचायत समिती, पवनी येथून ते सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक होते व त्यांचा मृत्यू दिनांक १५/०४/२०२१ रोजी झाला. त्यांच्या पश्चात अर्जदारांची आई श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांचा मृत्यू दिनांक १८/११/२०२५ रोजी वृध्दापकाळाने मौजा पवनी येथे घरीच झाला. त्यांच्यापश्चात अर्जदार क्र. १ ते ४ हे त्यांचे वारसान आहेत.

३. अर्जदारांनी पुढे असे कथन केले की, त्यांचे वडील मृत्यू पावल्यानंतर त्यांना मिळणारी पेंशन त्यांची आई श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांना मिळत होती. त्यांची आई श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांचे दि भंडारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑप. बँक लि. भंडारा, शाखा पवनी, ता. पवनी, जि. भंडारा या बँकेत बचत खाते क्र. ००१९०३०२००३१५५३ मध्ये पेंशन रक्कम जमा होत होती. सदर खात्यामध्ये रुपये ४१०२/– जमा आहेत. तसेच भारतीय स्टेट बँक, शाखा पवनी येथे बचत खाते क्र. ३१७२७४७७१३७ मध्ये रक्कम रुपये १३६०३/– जमा आहेत. तसेच पंचायत समिती पवनी येथे श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांना मिळणारी फॅमीली पेंशनची रक्कम रुपये १,११,१८६/– जमा आहेत. सदरची संपूर्ण

रक्कम ही अर्जदारांची आई मृतक श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांची असल्यामुळे व मृतकाचे अर्जदार हेच वारसदार असल्यामुळे सदर रकमेवर अर्जदारांचा समसमान हिस्सा व अधिकारी आहे. त्यामुळे सदरची संपुर्ण रक्कम अर्जदारांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसान प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टिफिकेट) ची आवश्यकता आहे. करीता अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळावे, म्हणून अर्ज केला आहे.

४. अर्जदारांनी असेही कथन केले की, या अर्जाव्यतिरिक्त, अशाचा प्रकारचा अर्ज त्यांनी इतर कोणत्याही न्यायालयात यापुर्वी दाखल केलेला नाही. सदर अर्जाचे अनुषंगाने वर्तमापत्रात जाहिरनामा देण्यात आला असून वर्तमानपत्राची प्रत (नि.क्र. १५) सादर करण्यात आली आहे. त्यामध्ये नमुद कालावधीत कोणत्याही तिराईत व्यक्तीने सदर अर्जाकामी त्याची हरकत नोंदवल्याचे किंवा प्रतिदावा केल्याचे दिसुन येत नाही.

५. अर्जदारांनी आपली दावा सिध्द करण्याकरिता, अर्जदार क्र.३ याचा साक्ष हलफनामा (नि.क्र. ८) अभिलेखावर दाखल केला आहे. ज्यामध्ये त्यांनी अर्जातील मजकूर जसाच्या तसा नमूद केला आहे. अर्जदारांनी अभिलेखावर त्यांचा कागदोपत्री पुरावा म्हणून दस्तऐवज शालिनी दत्तात्रय तुळाणकर यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची पडताळीत प्रत (नि.क्र.९), शालिनी दत्तात्रय तुळाणकर यांचे खाते असलेल्या  दि भंडारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑप. बँक लि. भंडारा, शाखा पवनी, ता. पवनी, जि. भंडारा या बँकेत बचत खाते क्र. ००१९०३०२००३१५५३ च्या पासबुकची पडताळीत प्रत (नि.क्र.१०), वंदना विला घटवाई यांच्या आधारकार्डची पडताळीत प्रत (नि.क्र.११), वैशाली सुनील बापोरीकर यांच्या आधारकार्डची पडताळीत प्रत (नि.क्र.१२), विशाखा संजय भाके यांच्या आधारकार्डची पडताळीत प्रत (नि.क्र.१३), शालिनी दत्तात्रय तुळाणकर यांचे खाते असलेल्या भारतीय स्टेट

बँक, शाखा पवनी येथे बचत खाते क्र. ३१७२७४७७१३७ च्या पासबुकची पडताळीत प्रत (नि.क्र.१४) आणि ०५.०३.२०२६ रोजी 'पुण्यनगरी' या दैनिकात प्रकाशित झालेल्या प्रकाशनाची प्रत (नि. क्र. १५) दाखल केले आहेत. त्यानंतर, अर्जदारांनी त्यांचा पुरावा बंद केला आहे (नि. क्र. १७).

६. अर्जदार क्र. ३ ची कोणतीही उलटतपासणी झाली नसल्याने तिचे कथन अबाधित राहिले आहे. सायटेशन नोटीस आणि वर्तमानपत्रातील जाहीरनामा (नि.क्र. १५) च्या पाश्वभूमीवर आजतागायत कोणत्याही तिराईत पक्षाने अर्जदाराच्या विनंती संदर्भात कोणतीही हरकत नोंदविलेली किंवा प्रतिअर्ज केलेला नाही. सदरचा अर्जदारांचा मौखिक व कागदोपत्री पुरावा अखंडीत व अबाधित राहिल्याने त्यावर शंका घेण्याचे कोणतेही कारण उरत नाही.

७. अर्जदार क्र. १ ते ३ हे मृतक दत्तात्रय पंढरीनाथ तुळाणकर व श्रीमती शालिनी दत्तात्रय तुळाणकर यांचे मुली आहेत. हिंदू वारसाहक्क कायदा, १९५६ च्या कलम १५ (१) (अ) अन्वये, मृतक दत्तात्रय पंढरीनाथ तुळाणकर व श्रीमती शालिनी दत्तात्रय तुळाणकर यांची मालमत्ता अर्जदारांकडे हस्तांतरित होते.

८. त्यामुळे, अभिलेखावर आलेल्या पुराव्यांच्या आधारे, ' दि भंडारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑप. बँक लि. भंडारा, शाखा पवनी, ता. पवनी, जि. भंडारा या बँकेत बचत खाते क्र. ००१९०३०२००३१५५३ मध्ये, तसेच भारतीय स्टेट बँक, शाखा पवनी येथे बचत खाते क्र. ३१७२७४७७१३७ मध्ये, तसेच पंचायत समिती पवनी येथे श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांना मिळणारी फॅमीली पेंशनची रक्कम जमा असलेल्या मृत व्यक्तीच्या रकमेबाबत 'वारसा प्रमाणपत्र' (Succession Certificate) मिळण्यास अर्जदार पात्र आहेत. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:–

## <u>आदेश</u>

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) मृतक दत्तात्रय पंढरीनाथ तुळाणकर व मृतक श्रीमती शालिनी दत्तात्रय तुळाणकर यांची दि भंडारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑप. बँक लि. भंडारा, शाखा पवनी, ता. पवनी, जि. भंडारा या बँकेत बचत खाते क्र. ००१९०३०२००३१५५३ मध्ये खात्यामध्ये रुपये ४१०२/–, भारतीय स्टेट बँक, शाखा पवनी येथे बचत खाते क्र. ३१७२७४७७१३७ मध्ये रक्कम रुपये १३६०३/– व पंचायत समिती पवनी येथे श्रीमती शालीनी दत्तात्रय तुळणकर यांना मिळणारी फॅमीली पेंशनची रक्कम रुपये १,११,१८६/– मध्ये जमा असलेली एकूण १,२८,८९१/– रुपये (अक्षरी: एक लाख अठ्ठावीस हजार आठशे एक्यान्नव रुपये) इतकी रक्कम मिळण्याबाबत, नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर अर्जदारांच्या नावे 'भारतीय वारसाहक्क कायदा' (Indian Succession Act) च्या कलम ३७२ अन्वये वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) जारी करण्यात यावे.

स्वा/–
(**अ.वि.पंडित**)
दिनांकः २९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,
पवनी

# SHEDULE VIII

( See Section 377 )

## FORM OF SUCCESSION CERTIFICATE

## IN THE COURT OF CIVIL JUDGE JUNIOR DIVISION, PAUNI.

**To,**

1. Sau. Vandana Vilas Ghatwai
Before marriage
Ku. Vandana Dattatray Tulankar
R/o: Kitadi, Tah.: Lakhani, District: Bhandara.

2. Sau. Vaishali Sunil Baporikar
Before marriage
Ku. Vaishali Dattatray Tulankar
R/o: Adgaon Bk., Dist. Akola.

3. Sau. Vishakha Sanjay Bhake
Before marriage
Ku. Vishakha Dattatray Tulankar
R/o: Nilaj, Po. Amgaon(Adarsh), Tah.: Pauni

Whereas you applied on the **29th day June, 2026** for a certificate under Part X of the Indian Succession Act, 1925, in respect of the following Saving Account, namely :-

| Serial Number | Name of the Bank | Amount of saving Including interest, on date of application for certificate | Description and date of instrument, if any, by which the saving is secured. |
|---|---|---|---|
| **1** | **The Bhandara District Central Co-operative Bank Ltd. Bhandara, Branch Pauni, at Tah: Pauni, Dist: Bhandara Account No. 001903020031553** | **Rs.4,102/-** | **Nil.** |

| | | | |
|---|---|---|---|
| **2.** | **State Bank of India, Branch – Pauni, Tah. Pauni, District Bhandara Account No. 31727477137** | **Rs. 13,603/-** | **Nil** |
| **3.** | **Amount of Pension witheld at the Panchayat Samiti, Pauni** | **Rs. 1,11,186/-** | **Nil** |

This certificate is accordingly granted to you and empowers you to collect those saving amount (and) (to receive)(interest)(dividends) (on) (to negotiate) ( to transfer) (those securities) dated this 29 day of June, 2026.

sd/-
( **A. V. Pandit**)
Civil Judge Junior Division,
**Pauni.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. A. V. Pandit, Judicial Magistrate, First Class, Pauni. |
| Name of the Steno | : | S. S. Sathawane, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 29/06/2026 |
| Judgment signed by P.O. on | : | 29/06/2026 |
| Judgment uploaded on | : | 29/06/2026 |